**मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री यांनी घोषित केलेले विशेष पॅकेज अंमलबजावणी**
**"विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी देण्यात येणा-या शैक्षणिक सवलती " योजनेसाठी लेखाशिर्ष उपलब्ध करुन देणे.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्र.एफईडी-२००९/(५५/०९)/केंपुयो**
**मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२१.**
**दिनांक :-** १२ मार्च, २०१०

**वाचा:-** शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एफईडी-२००९/(६/०९)/केंपुयो, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.

**प्रस्तावना:-** पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम व वर्धा या ६ जिल्हयातील अत्यंत अडचणीत असलेल्या शेतक-यांच्या ४,३४,२९१ कुटुंबातील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्यासाठीच्या संदर्भाधीन दि.२७ फेब्रुवारी २००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी निधी अर्थसंकल्पित व्हावा म्हणून नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** "विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेंतर्गत द्यावयाच्या शैक्षणिक सवलती" या नवीन योजनेकरिता मागणी क्र.ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण-८०- सर्वसाधारण, ८०० - इतर खर्च ) (०२) (४९) विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शैक्षणिक सवलती, २२०२H १५१ दत्त मत ३१ सहायक अनुदाने, हे लेखाशिर्ष उघडण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेश महालेखापाल कार्यालय,मुंबई यांचे संदर्भ क्र.TM/CH.SESD/UOR/१०६०, दि.२२.१०.२००९ चे पत्र तसेच वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१३८/अर्थ-८, दि.१८.२.२०१० नुसार दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

३.	सदर आदेश शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१००३१२११८१८३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(स.ब.अडकमोल)
**उपसचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा.मंत्री (शालेय शिक्षण ) यांचे स्विय सहायक,
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्विय सहायक,
मा.राज्यमंत्री (क्रिडा) यांचे स्विय सहायक,
मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्विय सहायक
शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.),महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक(प्राथमिक)महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२(लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकार, अमरावती/ अकोला/ यवतमाळ/ बुलढाणा/ वाशिम/ वर्धा.
विभागीय उपसंचालक,नागपूर.
शिक्षणाधिकारी(प्राथमिक/माध्यमिक) ,जिल्हापरिषद अमरावती/ अकोला/ यवतमाळ/ बुलढाणा/ वाशिम/ वर्धा.
नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई.
वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
सहसचिव/ सर्व उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती - केंपुयो

E:\kempyo\G.RG.R 55-09.lwp